# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं.

**दिनांक : 15.10.2026** **वार : गुरुवार**

---

## ठळक बातम्या

1. लडाखमधील 3 हजार कोटी रुपयांच्या विकास प्रकल्पांचं उद्घाटन आणि लोकार्पण आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार.
2. रेल्वे कर्मचाऱ्यांना 78 दिवसांच्या वेतनाइतका बोनस देण्यास केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी.
3. महिला शेतकरी  दिवसानिमित्त देशभरात आज विविध कार्यक्रमांचं आयोजन.
4. चौथ्या टी-20 क्रिकेट सामन्यात वेस्ट इंडिजकडून भारताचा पराभव; दोन्ही संघांची मालिकेत 2 -2 अशी बरोबरी.

## सविस्तर बातम्या

**पंतप्रधान मोदी लडाख**

लडाखमधील सुमारे 3 हजार 350 कोटी रुपयांच्या पाच प्रमुख विकास प्रकल्पांचं उद्घाटन आणि लोकार्पण आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते दूरदृश्य प्रणालीद्वारे होणार आहे. लेह इथल्या कुशोक बकुला रिम्पोची विमानतळावर उभारण्यात आलेल्या नवीन प्रवासी टर्मिनल इमारतीचं उद्घाटन, सीमा  रस्ते  संघटनेनं बांधलेल्या 298 किलो मीटर लांबीच्या निम्मू-पदुम-दारचा रस्त्याचे राष्ट्रार्पण, 9 मेगावॅट क्षमतेच्या 'हानू' लघु जलविद्युत प्रकल्पाचं आणि 66 केव्ही दुहेरी-सर्किट असलेल्या 'दाह-हानू-खालत्सी' पारेषण वाहिनीचं उद्घाटन पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते करण्यात येईल. याशिवाय पंतप्रधान लेह मधल्या सिंधू घाट इथं भारतातील पहिल्या 'पेट्रोग्लिफ संवर्धन उद्याना'चं तसंच 'हिम सरोवर' प्रकल्पा अंतर्गत 40 गावांमध्ये विकसित केलेल्या 40 जलस्रोतांचं उद्घाटनही पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते आज करण्यात येणार आहे.

**कॅबिनेट निर्णय**

रेल्वेच्या 11 लाख 40 हजारांहून अधिक कर्मचाऱ्यांना 78 दिवसांच्या वेतनाइतका उत्पादकतेशी संलग्न बोनस देण्यास काल केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी बैठकीनंतर घेतलेल्या पत्रकार परिषदेत या निर्णयांची माहिती दिली. या बोनससाठी 2 हजार 9 कोटी रुपयांहून अधिक रकमेची तरतूद करण्यात आली असून पात्र कर्मचाऱ्यांना 78 दिवसांच्या वेतनाइतकी 17 हजार 951 रुपयांपर्यंतची रक्कम देण्यात येईल. बोनससाठी पात्र कर्मचाऱ्यांमध्ये रेल्वेमार्गांची देखभाल करणाऱ्यांसह लोकोपायलट, गार्ड, स्टेशनमास्तर, तंत्रज्ञ इत्यादी क गटातील कर्मचाऱ्यांचा समावेश असेल.

तसंच राष्ट्रीय सामाजिक सहाय्य कार्यक्रमाच्या अंमलबजावणीला 2026-27 ते 2030-31 अशी आणखी पाच वर्षांची मुदतवाढ देण्याचा निर्णयही  या बैठकीत घेण्यात आला. या कार्यक्रमाचं प्रधानमंत्री सामाजिक सहायता योजना असं नामांतर करण्यात आलं असून त्यासाठी 53 हजार 428 कोटी रुपयांच्या निधीलाही यावेळी मंजुरी देण्यात आली.

आयडीबीआय बँकेच्या धोरणात्मक फेररचनेला आर्थिक व्यवहारविषयक मंत्रिमंडळ समितीनं मंजुरी दिली आहे. आयडीबीआय बँकेच्या मालकीच्या 60 पूर्णांक 72 टक्के हिश्शाची धोरणात्मक खरेदीदारास विक्री करण्याचा निर्णय घेण्यात आला असून कॅनडास्थित फेअरफॅक्स फायनान्शियल होल्डिंग्ज लिमिटेडची धोरणात्मक खरेदीदार म्हणून निवड करण्यात आली आहे.

**महिला किसान दिन**

देशाच्या कृषी क्षेत्रातील महिलांच्या योगदानाचा राष्ट्रीय पातळीवर गौरव करण्याच्या उद्देशानं केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण विभागाच्या वतीनं आज नवी दिल्लीत महिला शेतकरी दिवस साजरा करण्यात येणार आहे. महिला या कृषी क्षेत्राचा अविभाज्य भाग असून पेरणीपासून पिकाच्या कापणीपर्यंतच्या प्रत्येक टप्प्यात तसंच पशुधनाचं व्यवस्थापन, बियाणांचं संवर्धन अशा शेतीशी संबंधित अनेक कामांमध्ये महिलांची महत्त्वाची भूमिका असते असं कृषी मंत्रालयानं म्हटलं आहे.

हा कार्यक्रम संयुक्त राष्ट्रांच्या 'आंतरराष्ट्रीय ग्रामीण महिला दिना'च्या निमित्तानं आयोजित केला जात असून 'विकसित कृषी आणि विकसित भारत घडवण्यात महिला शेतकऱ्यांची भूमिका' अशी या दिवसाची मध्यवर्ती संकल्पना आहे. हा महिला शेतकरी दिवस कार्यक्रम देशातील विविध राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशात आज साजरा करण्यात येणार आहे.

कृषी-अन्न प्रणालीमधील महिला शेतकऱ्यांच्या योगदानाला जागतिक स्तरावर मान्यता मिळवून देण्यासाठी संयुक्त राष्ट्रांनी 2026 हे वर्ष 'आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष' म्हणून घोषित केलं आहे.

**समिती स्थापना**

ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या समस्यांचं निराकरण करण्याच्या दृष्टीनं उपाययोजना सुचवण्यासाठी केंद्र सरकारनं एका समितीची स्थापना केली आहे. नीती आयोगाचे माजी सदस्य प्राध्यापक रमेश चंद या समितीचे अध्यक्ष असतील. महाराष्ट्र आणि कर्नाटकातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे प्रतिनिधी, केंद्रीय कृषी मंत्री तसंच केंद्रीय ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक वितरण मंत्री यांच्यातल्या बैठकीत ही समिती स्थापन करण्याबाबत चर्चा झाली होती.

**भारत ओशन करार**

अंटार्टिक महासागरातील मासेमारीसंदर्भातील सदर्न इंडियन ओशन फिशरीज करारामध्ये भारताच्या सहभागाला केंद्र सरकारनं मंजुरी दिली आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर धोरणात्मक दृष्टी ही बाब महत्त्वाची असून, जागतिक मत्स्यव्यवसाय प्रशासनामध्ये भारताची स्थिती अधिक बळकट होणार असल्याचं मत्स्यव्यवसाय, पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय मंत्रालयानं म्हटलं आहे. यामुळे भारताच्या मासेमारी क्षेत्राचा विस्तार आंतरराष्ट्रीय जलक्षेत्रात होण्याच्या दृष्टीनं एक प्रादेशिक आराखडा उपलब्ध होणार आहे. त्यामुळे भारताच्या नील अर्थव्यवस्थेला बळकटी मिळणार आहे.

**जयंशकर-कॅनडा**

परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर आणि कॅनडाचे परराष्ट्र मंत्री अनिता आनंद यांनी दोन्ही देशांच्या धोरणात्मक भागीदारी, द्विपक्षीय संबंध आणि प्रमुख सहकार्य क्षेत्रांमध्ये सहकार्य वाढवण्यासाठी सुरू असलेल्या प्रयत्नांचा आढावा घेतला. त्याशिवाय परस्पर हिताच्या प्रादेशिक आणि जागतिक घडामोडींवर विचारांची देवाणघेवाण केली. तसेच, सुरक्षा आणि संरक्षण क्षेत्रातील सहकार्य अधिक बळकट करण्याबाबत आणि ऊर्जा क्षेत्रातील सहकार्य विस्तारण्याबाबत त्यांनी सविस्तर चर्चा केली.

**सिंगापूर जहाज होर्मुझ**

होर्मुझच्या सामुद्रधुनीतून प्रवास करत असलेल्या सिंगापूरच्या 2 व्यापारी जहाजांवर क्षेपणास्त्र हल्ले करण्यात आले. यातलं एक व्यापारी जहाज आग लागून बुडालं, या जहाजावरचे सर्व 21 कर्मचारी सुरक्षितपणे बाहेर पडले. तर दुसऱ्या जहाजाच्या बाह्य आवरणाचे नुकसान झालं; त्यातील 22 कर्मचारी देखील सुखरूपपणे बाहेर पडले. सिंगापूरच्या सागरी आणि बंदर प्राधिकरणानं या घटनेचा निषेध केला असून व्यापारी जहाजांवर सुरू असलेल्या हल्ल्यांबद्दल तीव्र चिंता व्यक्त केली आहे. तर अमेरिकेच्या चिथावणीमुळे नियमांचं उल्लंघन करणाऱ्या जहाजांविरुद्ध निर्णायक प्रत्युत्तर देण्यात येईल असा इशारा इस्लामिक रिव्होल्यूशन

गार्ड कॉर्प्सचे नौदलाचे कमांडर अली अझमाई यांनी दिला आहे. होर्मुझची सामुद्रधुनी आणि ओमानच्या आखातातून ये-जा करणाऱ्या जहाजांनी आंतरराष्ट्रीय नियमांनुसार परवानगी घेणं आवश्यक आहे असं त्यांनी म्हटलं आहे.

**क्षेपणास्त्र चाचणी**

उत्तर कोरियानं पाणबुडीतून डागण्यासाठी तयार केलेल्या क्रूझ क्षेपणास्त्रांची चाचणी घेतली आहे. उत्तर कोरियाच्या लष्करानं देशाच्या पूर्व सागरी हद्दीत या 2 प्रकारच्या क्षेपणास्त्रांची चाचणी घेतली. दक्षिण कोरियाच्या लष्कराने या चाचण्यांवर तात्काळ कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही.

**दूरसंचार मंत्री दौरा**

केंद्रीय दूरसंचार मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया आजपासून 18 ऑक्टोबरपर्यंत मध्य प्रदेशातल्या अशोकनगर जिल्ह्याच्या 4 दिवसांच्या दौऱ्यावर जात आहेत.या दौऱ्यादरम्यान ते विविध विकासकामांचं उद्घाटन आणि नवीन प्रकल्पांची पायाभरणी करतील, तसंच विविध बैठका आणि सामाजिक कार्यक्रमांना उपस्थित राहतील. यामध्ये 17 ऑक्टोबरला अशोकनगरमध्ये नवीन टपाल कार्यालयाचं उद्घाटन आणि 18 ऑक्टोबरला शासकीय विधी महाविद्यालयातील कौशल्य विकास केंद्राची पायाभरणी सिंधिया यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

**बंगाल दुर्गा पूजा**

पश्चिम बंगालमध्ये दुर्गा पूजेच्या उत्सवासाठी सर्वत्र जय्यत तयारी सुरू आहे. कोलकाता आणि इतर भागांत उभारलेले सुशोभित मंडप, झगमगणारे दिवे आणि देवी दुर्गेच्या कलात्मक मूर्तींमुळे रस्ते उत्सवी रंगात न्हाऊन निघाले आहेत. यंदा पश्चिम बंगालमध्ये 57 हजार 500 ठिकाणी दुर्गा पूजेचं आयोजन करण्यात आलं आहे. उत्सव सुरक्षित आणि सुरळीत पार पाडावा, यासाठी पोलीस आणि प्रशासनानं सुरक्षा व्यवस्था, वाहतूक व्यवस्थापन आणि अन्य उपाय अधिक कडक केले आहेत.

**दिल्ली-विद्यार्थी मदत**

दिल्ली महानगरपालिकेच्या शाळांतील विद्यार्थ्यांना गणवेश आणि दप्तर खरेदीसाठी प्रत्येकी 1 हजार 370 रुपयांची मदत थेट विद्यार्थ्यांच्या खात्यात जमा होणार आहे.या संदर्भात दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी यासाठी 70 कोटी रुपयांचा निधी देण्यात आला असल्याची माहिती दिली. याचा फायदा महापालिकेच्या शाळांतील पाच लाखांहून अधिक विद्यार्थ्यांना होणार आहे.

**आशियाई क्रीडा स्पर्धा**

जपानमधील आइची-नागोया इथं नुकत्याच झालेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत सहभागी झालेल्या भारतीय खेळाडूंशी पंतप्रधान नरेंद्र मोदी आज नवी दिल्लीत संवाद साधणार आहेत. यंदाच्या या क्रीडा स्पर्धेत सलग दुसऱ्यांदा अव्वल 5 देशांमध्ये स्थान मिळवून भारतानं विविध क्रीडा प्रकारांमधली आपली स्पर्धात्मक क्षमता सिद्ध केली आहे. या स्पर्धेत भारतानं 21 सुवर्ण, 27 रौप्य आणि 37 कास्य अशा एकंदर 85 पदकांसह पदक तालिकेत चौथे स्थान पटकावलं.

**क्रिकेट**

हैदराबाद इथं काल झालेल्या चौथ्या टी-20 सामन्यात वेस्ट इंडिजनं भारतावर 24 धावांनी विजय मिळवला. त्यामुळे पाच सामन्यांच्या या मालिकेत आता दोन्ही संघ 2-2 असे बरोबरीत आहेत. वेस्ट इंडिजनं दिलेल्या 248 धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना भारतीय संघ 223 धावाच करू शकला. तत्पूर्वी वेस्ट इंडिजनं 20 षटकांत तीन गडी बाद 247 धावा केल्या. वेस्ट इंडिजचा कर्णधार शाई होप यानं पन्नास चेंडूत नाबाद 102 धावा केल्या. भारताच्या संजू सॅमसननं 56, तिलक वर्मानं 43 धावा केल्या. मालिकेतला पाचवा निर्णायक सामना येत्या शनिवारी बंगळुरू इथं होणार आहे.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.**